# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत..**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्कासह | सोमवार दि. १८/०९/२०१७ ते सोमवार दि. ०९/१०/२०१७ | मंगळवार दि. १०/१०/२०१७ ते मंगळवार दि. १७/१०/२०१७ | मंगळवार दि.३१/१०/२०१७ |
| विलंब शुल्कासह | मंगळवार दि १०/१०/२०१७ ते मंगळवार दि. १७/१०/२०१७ | बुधवार दि.१८/१०/२०१७ ते बुधवार २५/१०/२०१७ | |

*** दिनांक १८/१०/२०१७ ते २७/१०/२०१७ या कालावधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंटींग करणे.**

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन भरलेल्या (Upload केलेल्या) आवेदनपत्रांच्या याद्या वर दिलेल्या तारखांप्रमाणे तसेच प्रचलित पध्दतीप्रमाणे बँक ऑफ इंडियामध्ये चलनाद्वारे शुल्क भरून चलनाची प्रत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

२.नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

३. आवेदनपत्रामध्ये शासनआदेशानुसार विद्यार्थ्याने त्याचा आधारकार्ड क्रमांक भरणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक १६/०९/२०१७

www.fjs.co.in